**कालमर्यादा / तातडीचे**

जा.क्र.एबाविसे/का-५/ /२०१०.
आयुक्तालय, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य, रायगड भवन, पहिला मजला,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
दिनांक :- /१/२०१०.

प्रति
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
जिल्हा परिषद, (सर्व)

बाल विकास प्रकल्प अधिकारी
नागरी प्रकल्प (सर्व)

विषय :- राष्ट्रीय बालिका दिन - २४ जानेवारी,२०१० साजरा करणेबाबत.

संदर्भ :- केंद्र शासनाचे पत्र क्र. 5-1/2010 –CD, III, दिनांक १३/१/२०१०.

केंद्र शासनाचे संदर्भाधिन पत्राचे अनुषंगाने कळविण्यांत येते की, दरवर्षी २४ जानेवारी हा दिवस " राष्ट्रीय बालिका दिन " म्हणून साजरा केला जातो.

या वर्षीही राष्ट्रीय बालिका दिन - दिनांक २४ जानेवारी,२०१० रोजी सर्व अंगणवाडी केंद्र / मिनी अंगणवाडी केंद्रामध्ये अंगणवाडी कार्यकर्ती / मदतनीस आणि पर्यवेक्षिका यांचे मदतीने व्यापक प्रमाणात साजरा करण्यांत यावा. सदर कार्यक्रमामध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या ६ सेवांची प्रचार व प्रसिध्दीही करण्यांत यावी. प्रामुख्याने स्त्रीभृणहत्या, पुरुषांच्या तुलनेत स्त्रीयांचे कमी होत असलेले प्रमाण व बालविवाहास प्रतिबंध या विषयावर स्वंयसेवी संस्था, शाळा, प्रसिध्दी माध्यमे, कलाकार इत्यादीव्दारे व्यापक प्रसिध्दी कार्यक्रम आयोजित करण्यांत यावेत. राष्ट्रीय बालिका दिनी घेतलेल्या कार्यक्रमांचा अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
रायगडभवन, नवी मुंबई.